GLOCAL
COMMUNICATIONS

B/409,Dhamji Shamji Corporate Square,Next to Kanara Business Center,Off Ghatkopar –Andheri Linking Road,Laxmi Nagar,Ghatkopar (E)40075 Phone 7045370433



| Publication | Edition | Date | Page No. |
|---|---|---|---|
| Lokmat | Mumbai | 1/10/2017 | Page 08 |



# 'द टार्गेट' : कथा अर्थक्षेत्रातील अभिमन्यूची




आपल्याकडे शोधपत्रिकारितेची फारशी परंपरा नाही, पण एखाद्या पत्रकाराने ठरविलेच, तर अगदी खोल पुरलेले सत्यही खोदून काढता येतेच. नेमकी हीच गोष्ट दिल्ली-स्थित पत्रकार शांतनु गुहा रे यांच्या 'द टार्गेट' या पुस्तकाच्या बाबतीत घडलेली दिसते. या 'बेस्ट सेलर' पुस्तकाच्या इंग्रजी व गुजराती आवृत्तीनंतर, मराठी आवृत्तीबद्दल वाचकवर्गात उत्सुकता होतीच. शिवाय, या कथेचा विषयही रोचक आहे. २०१३ साली कमोडिटी बाजारात ५६०० कोटी रुपयांचे NSEL पेमेंट डिफॉल्ट प्रकरण घडले व याचे खापर NSEL एक्स्चेंजवर फोडण्यात आले. या प्रकरणाचे निमित्त करुन, तंत्र उद्योजक व NSEL, FTIL चे संस्थापक जिग्नेश शाह यांना अटक करुन, त्यांचे सर्व एक्स्चेंज साम्राज्य उद्ध्वस्त करण्यात आले. वरवर हे सगळे सरळ सोपे दिसत असले, तरी ते तसे नाही, या मागे मोठा कट आहे, षडयंत्र आहे, हे गुहांनी शोधून काढले आहे. गुहांनी तब्बल दोन वर्षे या पुस्तकावर काम केले. NSEL प्रकरण नक्की काय आहे, हे शोधून काढण्यासाठी त्यांनी या प्रकरणाची पाळेमुळे खोदली. गुहांच्या उत्खननात जिग्नेश शाह यांना या प्रकरणात अडकविण्यात आल्याचे समोर आले आणि म्हणूनच NSEL या कथित घोटाळ्याचे संपूर्ण प्रकरण त्यांनी 'द टार्गेट' या पुस्तकात मांडले आहे. जिग्नेश शाह यांना या प्रकरणात अडकवून नेस्तनाबूत करण्याचा कट रचण्यात, देशाचे माजी अर्थमंत्री पी. चिदम्बरम आणि त्यांच्या जवळच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांचा हात आहे, असा दावा गुहा यांनी या पुस्तकात केला आहे.

लेखक : शांतनु गुहा रे

पृष्ठे : १६८,

मूल्य : १९५ रुपये